आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१५ ऑक्टोबर २०२६ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- राज्य सरकारकडून सुट्या मसाल्यांच्या विक्रीला बंदी,

- यंदा दिवाळीतली एसटीची हंगामी भाडेवाढ रद्द

- सार्वजनिक रस्ते, गल्ल्या आणि पदपथांवर फटाके वाजवण्यावर मुंबई उच्च न्यायालयाकडून बंदी

- जळगाव जिल्ह्यात झालेल्या अपघातात ६ जणांचा मृत्यू

**आणि**

- सेन्सेक्स पंधराशेहून अधिक अंकांनी वधारला

**<><><><><>**

राज्य सरकारनं सुट्या मसाल्यांच्या विक्रीवर बंदी घातली आहे. अन्न आणि औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही घोषणा केली. मसाल्यांच्या पाकिटावर उत्पादनाचं नाव, त्यातले घटक पदार्थ, उत्पादकाचा तपशील, उत्पादनाची आणि पॅकेजिंगची तारीख, एक्सपायरी डेट असे सर्व तपशील ठळकपणे नमूद करणं बंधनकारक असणार आहे. तसंच मसाल्यांचं वजन आणि प्रमाण वाढवण्यासाठी विटांची भुकटी, खडू, लाकडाचा भुसा, किंवा इतर तत्सम पदार्थ मिसळणं, निकृष्ट दर्जाच्या मसाल्यांचं मिश्रण करणं किंवा अर्क काढलेल्या मसाल्याची विक्री करायला परवानगी नाही, अशी माहिती मुंढे यांनी दिली. याशिवाय मसाल्यात मेटॅनिल यलो, ऱ्होडामाईन बी, सुदान डाईज, लेड क्रोमेट असे प्रतिबंधित रंग वापरायला सक्त मनाई असेल. मसाल्यांची शुद्धता, सेंद्रीयता, नैसर्गिकता आणि आरोग्याच्या लाभांविषयी पुरावे नसताना दावे करणाऱ्यांवर नियमाप्रमाणे कारवाई केली जाईल, असंही मुंढे यांनी सांगितलं.

मसाल्यांचं उत्पादन आणि साठवणुकीत स्वच्छतेच्या दृष्टीनं, सार्वजनिक रस्ते, डांबरी पृष्ठभाग, गटारं, कचराकुंड्या किंवा जनावरांच्या गोठ्याजवळ मसाले वाळवता येणार नाहीत, मसाल्यांबरोबर रसायनं, कीटकनाशकं, औद्योगिक रंग किंवा इतर हानीकारक पदार्थ साठवायला मनाई असल्याचंही ते म्हणाले.

<><><><><>

राज्यातली दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता, यंदाच्या दिवाळीत एसटीची हंगामी भाडेवाढ केली जाणार नाही, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज सांगितलं. सणासुदीच्या हंगामात दर वर्षी प्रमाणे यंदा १ ते १५ नोव्हेंबर दरम्यान प्रवासी भाड्यात सरसकट १५ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव एसटी प्रशासनानं सादर केला होता. मात्र, आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या जनतेवर अतिरिक्त भार टाकणं योग्य नसल्याची भूमिका घेत, परिवहन मंत्र्यांनी हा प्रस्ताव फेटाळला.

एसटी महामंडळाच्या आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी प्रवाशांवर थेट भार टाकण्याऐवजी पर्यायी उपाययोजना करण्याची सूचना त्यांनी यावेळी केली.

<><><><><>

राज्य शासनाच्या सर्व सेवा नागरिकांना अखंडितपणे डिजिटल माध्यमातून मिळण्यासाठी संबंधित विभाग आणि महाआयटी यांनी समन्वयानं काम करावं, आणि २६ जानेवारीला डिजिटल सेवा प्लॅटफॉर्मचं लोकार्पण करण्याच्या दृष्टीनं सर्व प्रलंबित कामं ३१ डिसेंबरपर्यंत पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिले आहेत. ते आज वर्षा निवासस्थानी यासंदर्भात आयोजित बैठकीत बोलत होते.

<><><><><>

नवरात्र, दिवाळी आणि ख्रिसमस यासह वर्षभरातल्या सर्व सण-उत्सवांदरम्यान सार्वजनिक रस्ते, गल्ल्या आणि पदपथांवर फटाके वाजवण्यावर मुंबई उच्च न्यायालयानं पूर्ण बंदी घातली आहे. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या पीठानं आज हा निर्णय दिला. दिवाळीनंतर फटाक्यांच्या प्रदूषणामुळे जगणं अवघड होतं, विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना याचा प्रचंड त्रास होतो, असं मत न्यायालयानं नोंदवलं. फटाक्यांचं उत्पादन किंवा विक्रीवर बंदी घातलेली नाही, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं.

<><><><><>

परवाना न घेता गाळप सुरू करणाऱ्या कारखान्यांवर कारवाई केली जाईल, असा इशारा साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी दिला आहे. साखर कारखान्यांसाठी यंदाचा गाळप हंगाम आजपासून सुरू करायला मान्यता दिलेली असताना, या हंगामासाठी आतापर्यंत २० साखर कारखान्यांना परवाने दिले आहेत. राज्यातल्या २१३ कारखान्यांनी अर्ज केले

असून, उर्वरित अर्जांची छाननी सुरू आहे. या अर्जांसोबत सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी, आणि गाळप परवान्यासाठी आवश्यक अटींची पूर्तता झाली आहे की नाही याची तपासणी, सुरू आहे. ती पूर्ण झाल्यावर परवान्यांबाबत निर्णय घेतला जाईल, असं कोलते यांनी सांगितलं.

दरम्यान, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे, राज्यात केवळ १९ कारखान्यांनी या हंगामात ऊस गाळप सुरू केलं आहे, तर कर्नाटकात अद्याप गाळप सुरू झालं नसल्याचं वृत्त पीटीआयनं दिलं आहे. सर्वाधिक साखर उत्पादन करणाऱ्या या दोन्ही राज्यांमधले शेतकरी उसाला अधिक आधारभूत दर, आणि साखरेची किमान विक्री किंमत वाढवण्याची मागणी करत आहेत. हा प्रश्न सोडवण्यासाठी केंद्र सरकारनं एक समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, शेतकरी संघटनांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला असून त्यांचं आंदोलन सुरूच असल्याचं या बातमीत म्हटलं आहे.

<><><><><>

हिंदू धर्मातून इतर कोणत्याही धर्मात, धर्मांतर करणाऱ्या व्यक्तींना मागासवर्गीय प्रवर्गा अंतर्गत आरक्षणाच्या लाभांवर आपोआप दावा करता येणार नाही, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात तामिळनाडू सरकारने दाखल केलेली याचिका फेटाळून लावताना, न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांच्या पिठानं हा निर्णय दिला.

धर्मांतरापूर्वीच्या जातीमध्ये अनुभवलेला सामाजिक मागासलेपणा धर्मांतरानंतरही कायम राहत नाही, तसंच बिगर-हिंदू सामाजिक व्यवस्थेत धर्मांतर केल्यामुळे आपोआप कोणत्याही अधिसूचित मागासवर्गीय समुदायाचं सदस्यत्व प्राप्त होत नाही, असं न्यायालयानं यावेळी स्पष्ट केलं. हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त इतर कोणताही धर्म पाळणारी व्यक्ती अनुसूचित जातीचा दर्जा गमावते, असं न्यायालयानं सांगितलं.

<><><><><>

जळगाव जिल्ह्यात जामनेर तालुक्यात ट्रक आणि दुचाकीची धडक होऊन झालेल्या अपघातात सहा जण ठार झाले. अपघातानंतर ट्रकचालक फरार झाला आहे. मृतांमधले सर्व जण मध्य प्रदेशातले रहिवासी आहेत. जामनेर तालुक्यात मालदाभाडी गावाजवळ हा अपघात घडल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

<><><><>

बँका, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या कंपन्या आणि रिलायन्सच्या समभागात झालेल्या तेजीमुळं देशातल्या शेअर बाजारात आज मोठी तेजी झाली. सेन्सेक्सनं आज १ हजार ५३३ अंकांची उसळी घेतली आणि तो ७४ हजार ३१६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३७५ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ९९७ अंकांवर बंद झाला.

<><><><>

भारताच्या माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात गेल्यावर्षी ९ टक्क्यांची वाढ झाली. या उद्योगातली उलाढाल २ लाख ७८ हजार कोटी रुपयांवर पोहोचल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव चंचल कुमार यांनी आज सांगितलं. सीआयआयनं मुंबईत आयोजित केलेल्या बिग पिक्चर समिट या परिषदेत ते बोलत होते. जगभरातल्या माध्यम कंपन्या आपल्या व्यावसायिक प्रारुपांचं पुनरावलोकन करत आहेत. ही मोठी देशांतर्गत बाजारपेठ, कथाकथनाची समृद्ध परंपरा, सांस्कृतिक विविधता आणि तरुण, सर्जनशील कार्यशक्ती असलेल्या भारतासाठी मोठी संधी असल्याचं ते म्हणाले. मात्र यासाठी बौद्धिक संपदेला बळकटी देणं, शाश्वत महसूल मिळेल याची खात्री करणं, शिस्तबद्ध गुंतवणूक आणि जागतिक स्तरावर प्रेक्षक तयार करण्याची गरज असल्याचं कुमार यावेळी म्हणाले.

भारताला २०३०पर्यंत १०० अब्ज डॉलर्सचं उद्दिष्ट गाठण्यासाठी आपल्या माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातल्या वाढीचा दर वार्षिक ९ टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याची गरज असल्याचं भारतीय उद्योग महासंघाने यावेळी जारी केलेल्या आपल्या श्वेतपत्रिकेत म्हटलं आहे. या स्थित्यंतरासाठी ३६ महिन्यांचं सुधारणा वेळापत्रकही देण्यात आलं आहे.

<><><><>

केंद्र सरकारच्या सुधारित उडान योजनेअंतर्गत सोलापूर - मुंबई आणि अमरावती - पुणे या हवाई मार्गांची निवड करण्यात आली आहे. केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी ही माहिती दिली.

<><><><>

SIR मधून वगळल्या गेलेल्या मतदारांसाठी केंद्रीय निवडणूक आयोग १७ आणि १८ ऑक्टोबर, तसंच २४ आणि २५ ऑक्टोबर रोजी राज्यभरातल्या सर्व मतदान केंद्रांवर विशेष

शिबिर घेणार आहे. BLO या ठिकाणी उपस्थित असतील अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीतल्या मेजर ध्यानचंद स्टेडियमवर आशियाई क्रीडा स्पर्धेतल्या पदक विजेत्या खेळाडूंची भेट घेतली. स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणाऱ्या पुरुष आणि महिला क्रिकेट संघांचाही यात समावेश होता. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने २१ सुवर्णपदकांसह एकूण ८५ पदकं जिंकली. ११ सुवर्ण पदकांसह देशाच्या पदकतालिकेत एकूण ३८ पदकांची भर घालणाऱ्या देशाच्या महिला खेळाडूंचं प्रधानमंत्री मोदी यांनी विशेष अभिनंदन केलं.

**- - - होल्ड 'बाईट' - - - -**

गेल्या दशकभरात भारताने क्रीडा परिसंस्था निर्माण करण्यासाठी मोठे परिश्रम घेतल्याचं त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

लास वेगास इथं सुरू असलेल्या २३ वर्षांखालच्या कुस्ती जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताचा विश्वजीत मोरे यानं ग्रीको रोमन प्रकारात विक्रमी रौप्यपदकाला गवसणी घातली आहे. पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटात केवळ एका गुणाच्या फरकाने त्याचं सुवर्णपदक हुकलं. ग्रीको रोमन प्रकारातलं भारताचं हे पहिलंच रौप्यपदक आहे. यापूर्वी विश्वजीतनं या स्पर्धेत २ वेळा कांस्यपदक पटकावलं होतं.

**<><><><><>**

आदिवासी बांधवांना रोजगार देण्यासाठी राज्य सरकारनं सुरू केलेल्या शबरी नॅच्युरल्स या ब्रँडचं वैशिष्ट्यपूर्ण पॅकेजिंग आणि डिझाइनला जपानचा प्रतिष्ठित गुड डिझाइन पुरस्कार मिळाला आहे. ९ हजारापेक्षा जास्त आदिवासी उत्पादकांना शबरी नॅचुरल्स हा ब्रँड रोजगार मिळवून देतो, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने त्र्यंबकेश्वर इथं होणाऱ्या धर्मध्वजारोहणासाठी तयार करण्यात आलेल्या ध्वजस्तंभाचं आज नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी विधिवत पूजन केलं.

<><><><><>

**धाराशिव** जिल्ह्यातल्या  तुळजाभवानी देवीच्या नवरात्रौत्सवात आज ललिता पंचमी निमित्त देवीची रथ अलंकार महापूजा मांडण्यात आली.

ललिता पंचमीच्या दिवशी **करवीर** निवासिनी महालक्ष्मी आपली सखी त्र्यंबुली हिच्या भेटीसाठी निघते अशी आख्यायिका आहे. त्या निमित्तानं देवीच्या पूजेसाठी आज विशेष सजावट करण्यात आली होती.

**चंद्रपूर** जिल्ह्यातल्या माता महाकाली महोत्सवाची आज सुरुवात झाली. पाच दिवसांच्या या महोत्सवात एकवीरा देवीच्या मंदिरातून, महाकाली मंदिरापर्यंत देवीची पालखी मिरवणूक काढली जाते.

//<><><><><>//